सत्र खटला क्र.९५/२०२५.
सरकार –वि– मोहसिन + 1
निशाणी क्र. १३

सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. <u>०१</u> यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नांव | – सुभाष गिताराम खरात |
| वय | –५५ वर्षे. |
| व्यवसाय | – लिपीक, नगर परिषद, बुलडाणा |
| राहणार | –रा. बुलडाणा ता. जि. बुलडाणा. |

<u>सरतपास सरकारी वकील श्री.भटकर यांचे मार्फत</u>–

०१. मी मागील ३० वर्षापासून नगर परिषद, बुलडाणा, येथे नेमणुकीस आहे. आजरोजी मी अतिक्रमण विभागात प्रमुख म्हणुन तेथे कार्यरत आहे. दि.२५.०५.२०२४ रोजी मी त्याच पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी आम्हास जयस्वाल चौक ते कोर्ट चौक दरम्यान अतिक्रमण काढण्याची मोहीम सुरु करावयाची होती. त्याप्रमाणे आम्ही सकाळी ११.०० वा. रस्त्यावर बसलेले कपडयाचे दुकानदार व इतर असे अतिक्रमण काढण्याची सुरुवात केली. तेव्हा माझेसोबत इतर कर्मचारी नामे शिवाजी बेंडवाल, शेख जाकीर शेख लाल, शेख इब्राहीम, रवि आव्हाळ व इतर होते. त्यावेळेस आमचेसोबत ट्क्टर नेले होते. आम्ही अतिक्रमण काढत असतांना सदर आरोपींनी माझ्यासोबत तसेच पथकातील इतर कर्मचा–यांसोबत अरेरावीची भाषा केली आणि अतिक्रमण हटविण्यास त्यांनी आम्हास मज्ञाव केला. त्यांनी केलेल्या कृत्यामुळे आमच्या शासकीय कामकाजामध्ये अडथळा निर्माण झाला तसेच त्यांनी तशी भाषा वापरल्यामुळे, मी त्यांचे विरुध्द फिर्याद दिली. माझी फिर्याद मला दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा असून बरोबर आहे. ती <u>नि.क्र.१४</u> वर आहे. छापील पहिली खबर आता मला दाखविली. त्यावर सुध्दा माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा असून बरोबर आहे. ती <u>नि.क्र. १५</u> वर आहे. पोलीसांची माझ्याकडे घटनेबाबत विचारपूस करुन माझे बयाण नोंदविले होते. तसेच मी पोलीसांना घटनास्थळ दाखविले होते. असे झाले नाही की, त्यावेळेस दोन्ही आरोपींनी शिवराम रामलाल बेंडवाल आणि शेख जाकीर शेख लाल यांचे सोबत लोटपाट केली तसेच मला मारण्यासाठी माझ्या अंगावर धावून गेले.

<u>प्रस्तुतचा साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने, सरकारी वकीलांनी साक्षीदाराची उलटतपासणी घेण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली</u>.

सत्र खटला क्र.९५/२०२५.
सरकार –वि– मोहसिन + 1
निशाणी क्र. १३

उलटतपास सरकारी वकील श्री. भटकर यांचे मार्फत.

०२. हे खरे नाही की, घटनेचे वेळेस आरोपींनी शिवराम बेंउवाल तसेच शेख जाकीर यांना लोटपाट करुन, माझे अंगावर मारण्यास धावून आले. माझे फिर्यादमधील तसेच पोलीस बयाणातील अधोरेखांकीत भाग 'अ' मला वाचून दाखविला. मी पोलीसांना तसे सांगितले नव्हते. असे माझे फिर्यादमध्ये तसेच बयाणामध्ये लिहण्याचे कारण मी सांगू शकत नाही. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

उलटतपास आरोपीतर्फे श्री. राज शेख वकील यांच्या मार्फत –

०३. हे खरे आहे की, सुरुवातीला नगर परिषद, बुलडाणा, येथे माझी नेमणुक सफाई कामगार म्हणुन झाली होती. हे खरे आहे की, आजरोजी माझ्याकडे ग्रंथपाल यांचा सुध्दा कार्यभार आहे. हे खरे नाही की, अतिक्रमण हटाव मोहीम सुरु करण्यापुर्वी अतिक्रमण धारकांना लेखी सुचना देणे गरजेचे असते. तथापी हे खरे आहे की अतिक्रमण हटविण्यासाठी संबधीतांना ०३ दिवसाचा कालावधी नियमाप्रमाणे द्यावा लागतो. हे खरे आहे की, अतिक्रमण मोहीमेबददल जाहीर सुचना सुध्दा करावी लागते. हे खरे आहे की, सदर प्रकरणामध्ये आम्ही आरोपींना तशी लेखी सुचना दिली नव्हती. हे खरे आहे की घटनेचे वेळेसे शिवराम बेंडवाल तसेच शेख जाकीर हे निवृत्त कर्मचारी होते. त्यांना सोबत घेण्यासाठी त्यादिवशी कोणतेही लेखी आदेश नव्हते. हे खरे आहे की, बुलडाणा येथील नगर परिषद तसेच पोलीस स्टेशन लागूनच आहे. हे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे त्या दिवशी आम्ही अतिक्रमण हटाव मोहीम राबवत नव्हतो तसेच त्या दिवशी कोणतीही घटना घडली नाही. हे खरे नाही की, असे मी खोटे सांगत आहे की, आरोपींनी माझे सोबत अरेरावीची भाषा वापरली. हे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण. फेरतपास काही नाही.

वा.दा.ब. अ.क.क.

ASHOK GURUDASMAL SANTANI
Digitally signed by ASHOK GURUDASMAL SANTANI
Date: 2026.02.26 13:12:05 +0530

(ए. जी. संतानी)
जिल्हा न्यायाधीश क्र. २
बुलडाणा

समक्ष

ASHOK GURUDASMAL SANTANI
Digitally signed by ASHOK GURUDASMAL SANTANI
Date: 2026.02.26 13:12:14 +0530

(ए. जी. संतानी)
जिल्हा न्यायाधीश क्र. २
बुलडाणा

दिनांक : २५/०२/२०२६.